स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

समाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन प्रबंधाचा आराखडा (Synopsis)

-संशोधनाचा विषय-

आदिवासी समाजातील नेतृत्व मा. विष्णुजी सवरा: एक चिकित्सक अभ्यास

-संशोधक-

श्री. भावार्थे संतोष बुधाजी

-मार्गदर्शक-

प्रा. डॉ. अडकिणे नवनाथ गोविंदराव

राज्यशास्त्र विभागप्रमुख

कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी

ता. उमरी, जि.नांदेड

-संशोधन केंद्र-

पीपल्स कॉलेज, नांदेड

मे २०१९

प्रस्तावना

राज्यशास्त्राचा जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॲरिस्टॉटल यांच्या मते, मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. (Man is social by nature) सुरुवातीच्या भटकंतीप्रधान जीवनाकडून तो कुटूंब समाज व राज्य या संस्थांपर्यंत विकसित होत आलेला आहे. म्हणजेच 'समाज' हा व्यक्तीजीवनाचा अविभाज्य घटक राहिलेला आहे. समाज ही संकल्पना विभिन्न अर्थांनी वापरली जाते. उदा. हिंदू समाज, मुस्लीम समाज, शीख समाज अशा धार्मिक संदर्भांनी, तर कधी आदिवासी समाज, नागरी समाज, ग्रामीण समाज अशा स्थलवाचन उल्लेखाने, तर कधी ब्राम्हण समाज, मराठा समाज, धनगर समाज अशा जातिवाचक संदर्भातही समाज संकल्पना वापरली जाते. मॅक आयव्हर व पेज यांनी समाजाची व्याख्या "समाज हा रुढी, आचारविचार व वर्चस्व अनेक वर्ग व भाग यांच्यातील परस्पर सहकार्य आणि त्यांच्यातील मानवी व्यवहार त्यांचे नियंत्रण यांचे गुंतागुंतीचे परंतु सतत बदलणारे जाळे" अशी केली आहे. प्रत्येक समाजामध्ये सामान्यपणे आढळणारी वैशिष्टये म्हणजे – विशिष्ट भौगोलिक प्रदेश, प्रजोत्पादन, श्रमविभाजन व सहकार्य, संस्कृती, साधर्म्य - वैधर्म्य, अमूर्त स्वरुप, आदर्शकांची संकल्पना, आत्मनिर्भरता, सामाजिक नियंत्रण, व तत्सम गटांपासून पृथकता ही होत.

भारतीय आदिवासी समाज :

भारतातील आदिवासींच्या वसाहतीसंबंधीचा आढावा घेतल्यावर असे दिसते की त्यांची वस्ती प्रामुख्याने जंगलात, दऱ्याखोऱ्यांच्या आणि पर्वतांनी व्यापलेल्या प्रदेशात आढळते. त्यामुळे त्यांना 'गिरीजन' असे म्हटले जाते. ते मुळचे याच भूमीवरचे असल्यामुळे त्यांना भूमिजन / भूमिज असेही म्हणतात. नेहमी अरण्यात राहणारे म्हणून "अरण्यक" असेही त्यांना संबोधण्यात येते. भारतीय संविधानाने त्यांना आदिम जाती, जनजाती, अनुसूचित जमाती असे संबोधले आहे.

इ.स. १९६२ साली सिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची व्याख्या पुढीलप्रमाणे केली –

"एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षरओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात."

समाज कोणताही असो सामाजिकी करणाची प्रक्रिया हे त्याचे वास्तव असते. ही प्रक्रिया आधुनिक काळात प्रगल्भ झाली असली तरी जेव्हापासून मनुष्य सांघिक जीवन जगू लागला व सांघिक नियंत्रण ठेवण्यासाठी काही प्रारंभिक स्वरुपाच्या संस्था निर्माण झाल्या त्यातूनच पुढे अस्पष्ट स्वरुपात 'नेतृत्व' या संकल्पनेचा उदय झाला. राज्यशास्त्र शब्दकोशात नेतृत्वाची व्याख्या – एखाद्या गटाचे विशिष्ट ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचे संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतूने प्रेरीत झालेले वर्तन – अशी केली आहे. समूहाच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने हा सर्वोत्तम माणूस आहे अशी खात्री असली तरच समूहातील व्यक्तींचे वर्तन व कृती प्रभावीत करणे नेत्याला शक्य होते. शिवाय अनुयायांमध्ये आबंधनाची भावना निर्माण होणे नेतृत्वासाठी आवश्यक असते.

भारतीय राज्यघटनेने प्रातिनिधिक लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे निवडणूका, प्रातिनिधिक संस्था, लोकप्रतिनिधी, लोककल्याण, कल्याणकारी राज्य या बाबी स्वाभावीक बनल्या. शिवाय स्वातंत्र्य, समता व न्याय या तत्वांमुळे येथील लोकशाहीला खरा अर्थ प्राप्त झाला. बचावात्मक भेदभावासारखे तत्व वापरुन मुख्य प्रवाहापासून तुलनेने दूर असलेल्या समूहांना त्या प्रवाहात सहभागी करुन घेण्याचे अनेक प्रयत्न येथे झाले, होत आहेत. पंचायत राजच्या स्थापनेद्वारे लोकशाही विकेंद्रीकरणाला योग्य दिशा मिळाली. सामूहिक विकास कार्यक्रम, विविध समूहांसाठी विशेष आयोगांची, विभाग, मंत्रालयांची, स्थापना इत्यादींमुळे प्रत्येक समाजातून नेतृत्व पुढे येऊ लागले. आदिवासी समाजही त्याला अपवाद नाही. महाराष्ट्रामध्ये अनेक आदिवासी नेतृत्वांनी आपल्या समाजाला पुढे नेण्याचा, विकसित करण्याचा, किमान त्याचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यापैकी काहींनी केवळ समाजकारण केले तर काहींनी समाजकारणाला राजकारणाचीही जोड मिळवून दिली. मधुकरराव पिचड, सुरुपसिंग नाईक, दामोदर शिंगडा, बाबुराव मडावी, विठ्ठलराव गेडाम, दामोदरदास मुंदडा, काळुराम धोदडे, सीताराम भोये, राजेंद्र गावीत, हरी शंकर महाले, बाबुराव जाधव, महादू बरोरा, शंकर नम, चिंतामण वनगा, कृष्णा घोडा, अप्पा भोये व श्री. विष्णुजी सवरा इ. अनेक नावे घेता येतील. अर्थात ही नेतृत्वे अगदी विनासायास पुढे आली आहेत असे नाही. प्रस्थापित सामाजिक, राजकीय, आर्थिक, प्रशासकिय व सांस्कृतिक चौकटींना आपलेसे करुन, प्रसंगी त्यांच्या विरोधात उभे राहुन त्यांनी समाजाला नेतृत्व दिले आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी विष्णु सवरा यांचे नेतृत्व निवडले आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतुन मार्ग काढत ते सहा वेळा महाराष्ट्राच्या विधानसभेवर निवडून गेले आहेत. त्यांनी आजवर दोन वेगळा आदिवासी विकास मंत्रीपद भूजविले आहे. आपल्या नेतृत्वकौशल्याच्या जोरावर त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सहकार, बँकिंग या क्षेत्रांमध्ये भरीव स्वरुपाचे कार्य केले आहे.

विषय निवडीचे समर्थन

कोणत्याही समाजाच्या विकासाचा अभ्यास करताना त्यासाठी कारणीभूत घटकांचा अभ्यास होणे आवश्यक असते. या अनेक घटकांपैकी नेतृत्व हा महत्वाचा घटक असतो. आदिवासी समाजाचा आजमितीला जो विकास झालेला आहे त्यामागे याच समाजातून पुढे आलेल्या नेतृत्वाचा सिंहाचा वाटा आहे. मात्र समाजपरिवर्तन किंवा समाजविकास यांचे अध्ययन करताना त्यासाठी कारणीभूत ठरलेल्या नेतृत्वाच्या अभ्यासाकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले आहे, हे प्रामुख्याने पहावयास मिळते. ही उणीव लक्षात घेऊन प्रस्तुत शोधप्रबंधासाठी "आदिवासी समाजातील नेतृत्व विष्णुजी सवरा: एक चिकित्सक अभ्यास" हे शीर्षक निवडले आहे. या शोधप्रबंधामध्ये विष्णुजी सवरा यांच्या जीवन व कार्याचा आढावा नेतृत्व विषयक सैध्दांतिक चौकटीतुन घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अभ्यासाची उद्दिष्टये

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टये निश्चित केली आहेत.

१) श्री. विष्णुजी सवरा यांच्या जीवनावर कौटुंबिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीचा पडलेला प्रभाव अभ्यासणे.

२) श्री. विष्णुजी सवरा यांचा शैक्षणिक दृष्टीकोन जाणून घेणे.

३) श्री. विष्णुजी सवरा यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

४) श्री. विष्णुजी सवरा यांच्या राजकीय कामगिरीचे मुल्यमापन करणे.

५) श्री. विष्णुजी सवरा यांचे 'पालकमंत्री' या दृष्टीने अध्ययन करणे.

६) श्री. विष्णुजी सवरा यांची 'आदिवासी विकास मंत्री' या दृष्टीने कारकीर्द अभ्यासणे.

गृहितके

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

१) श्री. विष्णुजी सवरा यांच्या नेतृत्वविकासात त्यांचे व्यक्तीगत गुण कारणीभूत आहेत.

२) श्री. विष्णुजी सवरा यांचे नेतृत्व हे व्यक्तिगत कर्तृत्व आणि पक्षातील नेत्यांचे पाठबळ यावर आधारलेले असल्यामुळे त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याला अनुकूलता मिळाली आहे.

३) श्री. विष्णुजी सवरा यांनी राजकीय कार्याच्या माध्यमातुन सत्ता प्राप्त करणे, टिकवून ठेवणे व सामाजिक – राजकीय प्रभाव निर्माण करुन आपल्या धोरणाला समाजमान्यता मिळवुन देण्यासाठी त्यांना अधिमान्यतेची समस्या भेडसावली नाही.

४) श्री. विष्णुजी सवरा यांनी मंत्रीपदाच्या माध्यमातुन सामाजिक आणि राजकीय योगदान दिलेले आहे.

५) श्री. विष्णुजी सवरा यांनी शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातुन सामाजिक आणि राजकीय योगदान दिलेले आहे.

अभ्यासाचा आराखडा

प्रस्तुत संशोधनकार्यासाठी व्यष्टी अध्ययन आराखडा निवडला जाणार आहे. श्री. विष्णुजी सवरा यांच्या नेतृत्वाचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे तथ्य संकल्पनांसाठी मुलाखत तंत्राचा वापर केला जाणार आहे. तसेच विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पध्दतींचा वापर करुन संशोधन केले जाणार आहे.

पूर्वतयारी

प्रस्तुत संशोधनासाठी निवडले गेलेले नेतृत्व मा. श्री. विष्णूजी सवरा हे भारतीय जनता पक्षाचे नेते आहेत. आदिवासीबहुल अशा पालघर जिल्हातील वाडा तालुक्यातील गालतरे हे त्यांचे मूळ गाव. सन १९९०, १९९९ व २००४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकांमध्ये ते वाडा मतदार संघातून निवडून आले. सन २००९ ची विधानसभा निवडणूक त्यांनी भिवंडी ग्रामीण मतदार संघातुन जिंकली. तर सन २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत विक्रमगड मतदारसंघातून ते निवडून आले. सधाच्या (२००४ ते २०१९) महाराष्ट्र राज्यमंत्रीमंडळामध्ये विष्णु सवरांकडे

आदिवासी विकास विभागाचे (कॅबिनेट) मंत्रीपद आहे. तसेच पालघर जिल्हयाचे पालकमंत्रीपदही त्यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

आदिवासी समाजातील शेतकरी कुटुंबातून पुढे आलेल्या श्री. विष्णुजी सवरा यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रांमध्ये चांगले योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचे अध्ययन होण्याच्या हेतूने हे संशोधन कार्य हाती घेण्यात आले आहे.

संशोधन साधने

संशोधन साधनांअभावी संशोधन कार्य अशक्य असते. गुणात्मक, संख्यात्मक किंवा संमिश्र स्वरुपाच्या संशोधन पध्दतीमध्ये तथ्यसंकलन हे अतिमहत्वाचे कार्य लागते. हे तथ्यसंकलन प्रामुख्याने पुढील दोन मार्गानी करावे लागते.

१) प्राथमिक स्त्रोत

२) दुय्यम स्त्रोत

प्राथमिक स्त्रोतांमधुन तथ्य संकलित करण्यासाठी निरीक्षण, मुलाखत व प्रश्नावली ही साधने वापरली जातात. तर दुय्यम स्त्रोतांमधुन तथ्य संकलनासाठी सरकारी प्रकाशने पूर्वीचे संशोधन, व्यक्तीगत नोंदी, जनगनना, सरकारी अहवाल, सेवेतील नोंदी इत्यादी साधने उपयुक्त ठरतात.

प्रस्तुत संशोधन हे व्यष्टी अध्ययन स्वरुपाचे असल्यामुळे तथ्य संकलनासाठी उपरोक्त दोन्ही प्रकारचे स्त्रोत वापरावे लागणार आहेत. श्री. विष्णुजी सवरा यांच्या जीवनविषयक तथ्यांच्या संकलनासाठी मुलाखत तंत्र वापरले जाणार आहे. तर त्यांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील कार्याच्या अभ्यासासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे.

तथ्यांवरील प्रक्रिया

प्रस्तुत संशोधन हे गुणात्मक अध्ययन स्वरुपाचे असल्यामुळे तथ्यांवर प्रक्रिया करण्यासाठी प्रामुख्याने विश्लेषण व वर्णन या पध्दती वापरल्या जाणार आहेत. आशय विश्लेषण करताना मुलाखती व निरीक्षणांतुन मिळालेल्या नोंदीमधील केंद्रावर्ती विचार विश्लेषित केले जाणार आहेत.

शक्य झाल्यास आशय विश्लेषणासाठी एनव्हिवो, अटलास टी किंवा मॅक्वडा या संगणक प्रणालींचा वापर केला जाईल.

प्रस्तावित प्रकरणे

"आदिवासी समाजातील नेतृत्व मा. विष्णुजी सवरा: एक चिकित्सक अभ्यास" या शोधप्रबंधाकरीता खालील प्रमाणे प्रकरण व्यवस्था केली जाणार आहे.

प्रकरण १ : प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात विषय निवडीमागची भूमिका, विषयाचे महत्व, उद्दिष्टये, गृहितके, तथ्यसंकलन, मर्यादा, अहवालाचा आराखडा इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण २ : आदिवासी समाज : ऐतिहासिक पार्श्वभूमी व स्वरुप -

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'आदिवासी' ही संकल्पना, आदिवासी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, आदिवासी समाजातील जाती – उपजाती, त्यांच्या आर्थिक – सांस्कृतिक – धार्मिक बाबी, वैशिष्टये तसेच आदिवासी समाजात होत असलेल्या सुधारणा इत्यादी घटकांची चर्चा करण्यात येणार आहे.

प्रकरण ३ : राजकीय नेतृत्व – संकल्पना व स्वरुप –

प्रस्तुत प्रकरणात पार्श्वभूमी, नेतृत्व संकल्पना, अर्थ, व्याख्या, नेतृत्वाचे प्रकार, नेतृत्वाची तंत्रे, 'राजकीय नेतृत्व' ही संकल्पना, यशस्वी नेतृत्वाची वैशिष्टये व गुणविशेष, महत्व, नेतृत्वाला अधिमान्यता इत्यादी घटकांची चर्चा केली जाणार आहे.

प्रकरण ४ : श्री. विष्णुजी सवरा यांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण–

प्रस्तुत प्रकरणात श्री. विष्णुजी सवरा यांच्या व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये कारणीभुत ठरलेल्या विविध पैलुंवर प्रकाश टाकला जाणार आहे. त्यांचे बालपण, शिक्षण, सामाजिक

कार्यातील सहभाग, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता म्हणून झालेली जडणघडण, राजकारणातील प्रवेश इत्यादी बाबींचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण ५ :- श्री. विष्णुजी सवरा यांचे शैक्षणिक कार्य -

प्रस्तुत प्रकरणात श्री. विष्णुजी सवरा यांचा शैक्षणिक दृष्टकोन व त्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला जाणार आहे. यामध्ये त्यांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण ६ :- श्री. विष्णुजी सवरा यांचे राजकीय व सामाजिक कार्य -

प्रस्तुत प्रकरणात श्री. विष्णुजी सवरा यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचे विवेचन केले जाणार आहे. राजकीय कार्यामध्ये त्यांनी पक्षीय संरचनेत केलेले कार्य, निवडणूक विषयक कामगिरी, मतदारसंघात पक्षबांधणी इत्यादी कार्यांचा आढावा घेतला जाईल. तर सामाजिक कार्यामध्ये त्यांनी केलेले समाज प्रबोधन, स्थापन केलेल्या सामाजिक संस्था इत्यादींचे विवेचन केले जाईल.

प्रकरण ७ :- श्री. विष्णुजी सवरा यांचे 'लोकप्रतिनिधी' या नात्याने कार्य -

प्रस्तुत प्रकरणात श्री. विष्णुजी सवरा यांनी 'लोकप्रतिनिधी' या नात्याने तसेच आदिवासी विकास मंत्री या नात्याने केलेल्या कार्याचे विवेचन केले जाणार आहे. तसेच पालघर जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून पार पाडलेल्या भूमिकेचे विवेचन केले जाणार आहे.

प्रकरण ८ :- सारांश व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात उपरोक्त सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन संशोधनांती निष्कर्ष मांडले जाणार आहेत.

<u>समस्या आणि मर्यादा</u>

आदिवासी समाजातील नेतृत्वावर हे अध्ययन करताना संशोधनाला काही मर्यादा आहेत. आदिवासी समाजातील सर्वच नेतृत्वांचा अभ्यास येथे केला जाणार नाही. शिवाय श्री. विष्णुजी सवरा यांच्या व्यक्तिमत्वाचे संशोधन करावयाचे आहे. त्यांच्या बाबतीतील लिखित स्वरुपाची माहिती मर्यादीत आहे. तथ्यसंकलनासाठी वापरल्या जाणाऱ्या मुलाखतंत्रालाही काही अंगभूत मर्यादा आहेत. त्यांचा परिणाम होण्याची शक्यता आहे. शासकीय पातळीवरुन माहिती उपलब्ध होण्यात मर्यादा पडू शकतात. शेवटी संशोधक हा व्यक्ती असल्याने त्यावरही अनेक मर्यादा पडतात उदा. वेळ, आकलनशक्ती, दृष्टीकोन इत्यादी.

या मर्यादा असून सुध्दा त्यांचा संशोधनावर कमीत कमी परिणाम होईल याची काळजी घेऊन संशोधन कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संदर्भ सुची

अ) संदर्भग्रंथ

१) गारे, गोविंद; आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ; सुगावा प्रकाशन, पुणे ; २००२

२) गारे, गोविद ; सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकूर आदिवासी; श्रीविदया प्रकाशन; पुणे;२००२

३) कुलकर्णी, पी.के.; दलितांचे आणि आदिवासींचे समाजशास्त्र; डायमंड प्रकाशन, पुणे; २०१२

४) कोडीतकर, सुरेश; आदिवासी जीवन कथा आणि व्यथा; सुगावा प्रकाशन, पुणे; २००८

५) घाटे, निरंजन; आदिवासींचे अनोखे विश्व; मनोविकास प्रकाशन, पुणे; २००९

६) देवगावकर, एस.जी. ; महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती; साईनाथ प्रकाशन; २००९

७) गारे, गोविंद; आदिवासी विकासातील दिपस्तंभ; श्रीविधा प्रकाशन, पुणे; २००३

८) गारे, गोविंद; सहयाद्रीतील आदिवासी : महादेव कोळी; आदिम साहित्य प्रकाशन, पुणे; २००७ (तृ. आ.)

९) भोळे, भास्कर ; राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण; पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर; १९८८

१०) पवार, प्रकाश, ; भारतीय राजकारण व नेतृत्वाची वाटचाल; डायमंड प्रकाशन, पुणे;२०१४

११) खैरनार, दिलीप; समाजशास्त्रीय मुलभूत संकल्पना; एज्यूकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद;२०१३.

१२) चौधरी, जी.बी. व अन्य ; आधुनिक समाजिक मानसशास्त्र; प्रशांत प्रकाशन, जळगाव ; २००८

१३) महाराष्ट्र आदिवासी विकास विभाग एक दृष्टीक्षेप – आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई.

१४) कुलकर्णी पी. ए. ; ग्रामीण व नागरी समाजशास्त्र परिचय; विद्या प्रकाशन, पुणे;२००६

१५) पंडीत, ग. शां. ; आदिवासी उत्थानाचा हाकार; श्रीगंधर्व - वेद प्रकाशन, पुणे ; २०१५

१६) चोरमारे, विजय; महाराष्ट्राचे राजकारणः नवे संदर्भ (संपा.) ; नवता प्रकाशन, मुंबई २०१४

१७) खेकाळे, ना.रा. ; राजकीय नेतृत्व; मंगेश प्रकाशन , नागपुर; १९९९

ब) नियतकालिके :-

१) लोकराज्य

२) परिवर्तनाचा वाटसरु

३) योजना

४) विवेक

५) आंदोलन

क) दैनिके :-

१) लोकसत्ता

२) महाराष्ट्र टाईम्स

३) सकाळ

४) लोकमत

५) प्रभात

ड) संकेतस्थळे :-

१) www.eci.gov.in

२) www.tribal.maharashtra.gov.in

३) www.myneta.info

४) www.goldenmaharashtra.in

५) www.bjp.org

कामाचे वेळापत्रक

प्रस्तावित संशोधनकार्य वेळेत पूर्ण होण्यासाठी कामाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे तयार केले आहे.

कार्ये	कालावधी
प्रस्तावलेखन	१ महिना
साधननिश्चिती	१ महिना
तथ्य संकलन	१ वर्ष
तथ्यांवर प्रक्रिया	६ महिने
अहवालाचा कच्चा आराखडा	३ महिने
अहवालाचा अंतीम मसूदा व सादरीकरण	६ महिने
एकूण	**२ वर्षे ५ महिने**

अभ्यासाच्या खर्चाचे अंदाजपत्रक

प्रस्तुत संशोधनकार्याच्या प्रवासात वेळाप्रमाणेच वित्ताचाही व्यय होणार आहे. त्यामुळे त्याचे नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे अंदाजपत्रक प्रस्तावित करण्यात आले आहे.

अभ्यासाचे पैलु	अंदाजे खर्च
मुलाखत, अनूसुचीची छपाई	रु. १,०००/-
प्रवास	रु. १०,०००/-
लेखन सामग्री	रु. ५,०००/-
अहवाल	रु. ५,०००/-
इतर	रु. २,०००/-
एकूण	**रु. २३०००/-**